ई-मेल द्वारे

# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर</u>

---

संदर्भ : दि.०३/१०/२०२४ रोजी प्रसिध्द झालेली **लघुलेखक (श्रेणी-३)** पदाकरीताची निवड यादी.

---

## <u>आ दे श</u> :-

<u>क्रमांक बी-०४/आस्था.१९/१६/२०२४</u> :- प्रमुख जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर हे खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेत. **<u>सदरचा आदेश दिनांक २७/११/२०२४ रोजी मध्यान्हपूर्व पासून अंमलात येईल.</u>**

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव, निवड यादीतील क्रमांक व पत्ता. | नविन नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|
| १) | श्री. सतिष भगवान खेडकर, लघुलेखक (श्रेणी-३) पदाच्या निवड यादीवरील **क्र. २९**, रा. आगसखांड, तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर. | **तदर्थ स्वरुपात (Ad-hoc basis)** नविन नेमणुकीने लघुलेखक (श्रेणी-३) या पदी सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, <u>कोपरगाव</u> येथे श्रीमती अश्विनी दत्तात्रय शेटे लघुलेखक (श्रेणी-३) निवड यादीवरील उमेदवार क्र.२७ या हजर न झाल्यामुळे रिक्त असलेल्या पदी. |

**टिप :-**

१) **उपरोक्त श्री. सतिष भगवान खेडकर यांनी भरती प्रक्रियेच्या वेळी घेण्यात आलेल्या इंग्रजी लघुलेखन १०० श.प्र.मि.** या परिक्षांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेले गुण प्राप्त केले नाहीत, त्यामुळे त्यांना सदर परिक्षा त्यांचे नेमणूकीचे दिनांकापासून एक वर्षाचे आत उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. **परिक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवेतून कमी (discharged from service ) केले जाईल.**

२) उपरोक्त उमेदवारांची नेमणूक ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक चारित्र-२०१७/प्र.क्र. ४८३/२०१७/१६-अ, दिनांक २८ ऑगस्ट २०१७ नूसार उमेदवाराची चारित्र व पूर्वचारित्र याची पडताळणीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. **उमेदवाराने सादर केलेली माहिती असत्य आढळून आल्यास प्रस्तुतचा नियुक्ती आदेश रद्दबातल करुन भारतीय दंडसंहितेनूसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.**

३) लघुलेखक (श्रेणी-३) म्हणुन नविन नेमणूक दिलेल्या कर्मचा-यांची **वेतन स्तर-एस १४ (३८६००-१२२८००)** मध्ये नेमणूक करणेत येत आहे.

४) त्यांना सुचित करणेत येते की, त्यांना दिलेली नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची असुन त्यांना कोणतेही कारण न देता व नोटीस न देता केव्हाही सेवेतुन कमी करणेत येईल.

५) **तसेच,** लघुलेखक (श्रेणी-३) म्हणून तात्पुरत्या स्वरुपात नविन नेमणूक दिलेल्या सर्व उमेदवारांना सुचित करण्यात येते की, हजर झालेनंतर त्यांना त्यांचे पदाचा राजीनामा दयावयाचा असल्यास, एक महिन्याची आगावू लेखी नोटीस अथवा एक महिन्याचे मुळ वेतन इतकी रक्कम भरावी लागेल.

६) तसेच त्यांना असेही सुचित करणेत येते की, ते नेमणुक दिलेल्या न्यायालयात सदर आदेश मिळालेपासून <u>सात दिवसांचे</u> आत हजर न झाल्यास त्यांना देण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्यांचे निवड यादीतील नाव कमी करण्यात येईल, याची नोंद घ्यावी

७) उपरोक्त कर्मचा-यांचा हजर झालेबाबतचा अहवाल त्वरीत **ईमेल दवारे** पाठविण्यात यावा

( अंजु शेंडे )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
<u>अहमदनगर</u>

जिल्हा न्यायालय, अहमदनगर, ))
दिनांक : २६/११/२०२४. ))

क्रमांक बी-०४/आस्था.१९/१६ /२०२४

प्रत माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत :-

१) सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कोपरगाव.

२) अधीक्षक, कार्यव्य/ले.व वि., जिल्हा न्यायालय, अहमदनगर.

३) वरिष्ठ लिपिक, कार्यव्यवस्थापन विभाग, जिल्हा न्यायालय, अहमदनगर.

४) जिल्हा प्रणाली व्यवस्थापक यांनी प्रस्तुतचा आदेश कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.

५) कार्यालयीन संचिका.

SSUlane 26/11/24

( सारिका सु. उलाने )
प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय,
अहमदनगर

जिल्हा न्यायालय, अहमदनगर, ))
दिनांक : २६/११/२०२४. ))